आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता
२६ ऑक्टोबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आदिवासी समुदायांच्या सक्रीय सहभागातूनच देशाचा पूर्ण विकास साधता येईल, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

- डिजिटल समावेशकता आणि शाश्वत ऊर्जा क्षेत्रात जागतिक बँकेनं ग्लोबल साऊथसाठी नवकल्पनांची द्विपक्षीय देवाणघेवाण करावी, असं अर्थमंत्र्यांचं आवाहन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार

**आणि**

- भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला दुसरा कसोटी सामना रोमांचक स्थितीत.

**<><><><><>**

आदिवासी समुदायांच्या सक्रीय सहभागातूनच देशाचा पूर्ण विकास साधता येईल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. छत्तीसगडच्या भिलाई इथं भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या दीक्षांत समारंभात त्या आज बोलत होत्या. आदिवासी समुदायांकडे नैसर्गिक जीवनशैलीतून मिळालेल्या ज्ञानाचं भांडार आहे, त्यांच्या जीवनशैलीतून आपण अनेक गोष्टी शिकू शकतो आणि देशाच्या शाश्वत विकासात योगदान देऊ शकतो, असंही राष्ट्रपतींनी नमूद केलं. या दीक्षांत

समारंभादरम्यान राष्ट्रपतींनी ७ स्नातकांना सुवर्णपदकानं सन्मानित केलं. छत्तीसगडचे राज्यपाल रामेन डेका, मुख्यमंत्री विष्णू देव साई आणि इतर यावेळी उपस्थित होते. राष्ट्रपती मुर्मू आज नया रायपूर इथं आरोग्य विज्ञान आणि आयुष विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभालाही उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांनी आपापल्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. २३ उमेदवारांच्या यादीत काँग्रेसनं राळेगाव इथून माजी मंत्री वसंत पुरके, सावनेरमधून अनुजा केदार, अर्जुनी-मोरगाव इथून दिलीप बनसोड, जालन्यातून कैलास गोरंट्याल आणि शीव-कोळीवाडा मतदारसंघातून गणेश यादव यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं धुळ्यातून अनिल गोटे, हिंगोलीतून रूपाली पाटील, शिवडीतून अजय चौधरी तर भायखळ्यातून मनोज जामसुतकर यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे.

**<><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या कालच्या चौथ्या दिवस अखेर ९९१ उमेदवारांचे बाराशे ९२ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत, अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत; ३० ऑक्टोबरला या अर्जांची छाननी होईल आणि ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येतील. विधानसभा निवडणुकीसाठी मतदान २० नोव्हेंबरला होत असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून कालपर्यंत सी व्हिजिल ॲपवर आचारसंहिता उल्लंघनाच्या बाराशे ५९ तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यातील बाराशे ५० तक्रारी निकाली काढल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. दरम्यान, राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी केलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, अंमली पदार्थ आणि मौल्यवान धातू इत्यादी स्वरुपात १०० कोटी ४० लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून राज्यात आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं सांगितलं.

**<><><><><>**

१३ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजल्यापासून ते २० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी साडे सहा पर्यंतच्या कालावधीत विधानसभा निवडणूकीच्या निकालांचे कल किंवा अंदाज म्हणजेच एक्झीट पोल, ओपिनियन पोल, प्रसार माध्यमांवर प्रसारित करण्यास केंद्रीय निवडणूक आयोगानं बंदी घातली आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण वाढावं यासाठी निवडणूक आयोग आणि स्थानिक प्रशासनाकडून विविध उपक्रम राबवले जात आहेत. सातारा जिल्ह्यात महाबळेश्वर तालुक्यात शालेय विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून आणि रांगोळी, चित्रं, घोषणाफलक यांच्या माध्यमातून मतदानाविषयी जनजागृती केली. तर माण तालुक्यात वाघमोडेवाडी इथं विद्यार्थ्यांनी मतदानाचं महत्त्व सांगणारं घोषवाक्य असलेले आकाशकंदिल तयार केले. पाटण तालुक्यात महिलांनी प्रभात फेरी काढून मतदानाचं आवाहन केलं. तसंच वयोवृद्ध स्त्री पुरुष मतदारांचा सत्कार करण्यात आला. नवी मुंबईत शाळा महाविद्यालयांमध्ये मतदार जागृतीविषयक

रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. कोपरीगाव इथल्या महापालिकेच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी मतदानाचा संदेश देणारी पत्रं आपल्या पालकांना लिहीली.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकांसाठी एनडीए आणि इंडिया आघाडीमध्ये जोरदार मोर्चेबांधणी सुरु आहे. झारखंडच्या जनतेला हेमंत सोरेन यांचं सरकार सत्तेतून खाली खेचायचे आहे, असा विश्वास भाजपाचे निवडणूक प्रभारी हेमंत बिस्वा सर्मा यांनी व्यक्त केला आहे. काँग्रेस तिकीटांची विक्री करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. तर दुसरीकडे भाजपा त्यांच्याच तळागाळातल्या कार्यकर्त्यांवर अन्याय करत असून बाहेरुन आलेल्यांना उमेदवारी देत असल्याचा आरोप काँग्रेस नेते इरफान अन्सारी यांनी केला आहे. झारखंडमध्ये इंडिया आघाडीचं सरकार पुन्हा सत्तेवर येईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

बिहार विधानसभेच्या चार जागांवरील पोटनिवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. तारारी, बेलागंज, इमामगंज आणि रामगढ या मतदारसंघात १३ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या चार जागांसाठी आतापर्यंत एकूण ५० उमेदवारी अर्ज दाखल झाले असून सर्वाधिक १७ अर्ज बेलागंज मध्ये दाखल करण्यात आले आहेत. अर्जांची छाननी सोमवारी होणार असून ३० ऑक्टोबर पर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या

कार्यक्रमात आज मुंबई शहर या जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

डिजिटल समावेशकता आणि शाश्वत ऊर्जा क्षेत्रात जागतिक बँकेनं ग्लोबल साऊथसाठी परिवर्तनीय अनुभवासह नवकल्पनांची द्विपक्षीय देवाणघेवाण करावी, असं आवाहन केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. त्या  वॉशिंग्टन इथं जागतिक बँकेच्या वार्षिक सभेत “भविष्यकालीन जागतिक बँक समूह” विकास समितीला संबोधित करताना बोलत होत्या. व्यापक सहभागाला चालना देण्यासाठी, मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना अधिक कर्ज घेण्यास प्रोत्साहन देत तसंच विकासाचा जोर वाढवत स्पर्धात्मक दरांच्या किंमत प्रारूपांसह परवडण्याजोग्या दरात जागतिक बँकेची सेवा आवश्यक असल्याचं सीतारामन यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, २७ तारखेला मन की बात या आकाशवाणीवरच्या कार्यक्रमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमाचा हा ११५ वा भाग आहे.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्या पुरुष संघांदरम्यान सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारताच्या ५ गडी बाद, १४७ धावा झाल्या आहेत. न्यूझीलंडनं दुसऱ्या डावात २५५ धावा करून भारतासमोर विजयासाठी ३५९ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे.

तीन सामन्यांच्या या मालिकेत न्यूझीलंड सध्या १-०नं आघाडीवर आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेशातल्या ज्ञानवापी संकुलाचं संपूर्ण सर्वेक्षण ए एस आय अर्थात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागामार्फत पुन्हा एकदा करण्याबाबत दाखल याचिका वाराणसी न्यायालयानं फेटाळून लावली आहे. फेब्रुवारी महिन्यात दाखल केलेली ही याचिका वरिष्ठ पीठाचे नागरी न्यायमूर्ती युगल शर्मा यांनी फेटाळली आहे. ए एस आय नं याआधी सर्वेक्षण न केलेल्या क्षेत्राचं सर्वेक्षण करावं अशी मागणी याचिकाकर्त्यानं केली आहे. याबाबत सुनावणी पूर्ण झाल्यानंतर जलदगती न्यायालयानं निकाल राखून ठेवला होता.

<><><><><>

केंद्रीय औषध मानक नियंत्रक संस्थेला देशातल्या चार औषधांच्या बॅच बनावट असल्याचं आढळलं असून त्यांनी ही औषधं बाजारातून परत घेण्याचे आदेश संबंधित औषध निर्माण कंपन्यांना दिले आहेत. परिणामशून्य असलेल्या एकूण ४९ औषधांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे.

<><><><><>

देशातल्या कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्राला चालना देण्यासाठी इंडिया एआय आणि मेटा यांनी जोधपूरच्या आयआयटी बरोबर मिळून एआय सृजनची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही संस्था अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद अर्थात एआयसीटीई सोबत मिळून कौशल्य आणि क्षमता निर्माण कार्यात कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञान विकसित करणार आहेत. इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं म्हटलं आहे की, या केंद्रामुळे कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातल्या संशोधनाला चालना मिळेल.

<><><><><>

फ्रान्स इथं सुरु असलेल्या डब्लू टी टी टेबल टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करत भारताच्या मनिका बात्रानं ऐतिहासिक कामगिरी केली आहे. तिनं काल रोमानियाच्या बेमाडेट सॅझोक्स हिचा सोळाव्या फेरीत ३-१ असा पराभव केला.

**<><><><><>**

सुप्रसिद्ध नर्तक कनक राजू यांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. गुस्सादी नृत्य प्रकाराचं जतन करण्यात राजू यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाची मोदी यांनी प्रशंसा केली आहे. त्यांचा वारसा भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील असं त्यांनी म्हटलं आहे. राजू यांच्या समर्पण आणि उत्कटतेमुळे सांस्कृतिक वारशाचे महत्त्वाचे पैलू त्यांच्या अस्सल स्वरूपात विकसित होऊ शकतील, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

दाना चक्रीवादळच्या पार्श्वभूमीवर हवामान विभागानं पश्चिम बंगाल आणि ओदिशाच्या काही भागात अतिवृष्टीची शक्यता वर्तवली आहे. तसंच तामिळनाडू, पुददूचेरी, कराईकल, केरळ आणि माहे इथं देखील अतिवृष्टीचा अंदाज व्यक्त केला आहे. दाना चक्रीवादळ ओदिशाच्या उत्तरेकडून पश्चिमेकडे सरकत असून हळूहळू त्याचा प्रभाव कमी होण्याची चिन्ह आहेत.

**//<><><><><>//**